# संजय निरुपम, फेरीवाल्यांच्या जीवावर उड्या मारू नका हे बिहार नाही! महाराष्ट्र आहे! मराठी माणूस पेटला तर 'हात' भाजेल

**संपादकीय**

जयश्री खाडिलकर-पांडेकृत

मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष संजय निरुपमना फेरीवाल्यांचा पुळका आला आहे. ही सहाजिक बाब आहे कारण निरुपमना मतं देणारे तेवढेच उरले आहेत. पण दुर्दैव असं की, या फेरीवाल्यांसाठीही ते काही करत नाहीत. त्यांना सुरक्षित कायमचे स्थान मिळावे, व्यवस्थित लायसन्स मिळावे यासाठी त्यांनी कधीही प्रयत्न केला नाही. फेरीवाला झोनची जबाबदारी त्यांनी सेना-भाजपावर सोडून दिली. त्यासाठी संजय निरुपम एकदाही महापालिका आयुक्तांना भेटले नाहीत. असे जे काम न करणारे असतात ते मग आरडाओरड करीत नेतृत्व टिकवण्याचे प्रयत्न करतात. निरुपम यांचे हेच सुरू आहे. बिहारमध्ये कदाचित ही रणनीती चाललीही असती. परंतु निरुपमजी, हे बिहार नाही. हा महाराष्ट्र आहे. इथे हे प्रयत्न असेच सुरू ठेवलेत तर फेरीवाल्यांच्या विरोधात संताप आणखी वाढत जाईल आणि मग अनधिकृत फेरीवाल्यांबरोबरच अधिकृत फेरीवाल्यांनाही पळ काढावा लागेल. निरुपमजींची मते जातील आणि नेतृत्वही संपेल. त्यांचे जाऊदे, पण मुंबईत काँग्रेसला मोठा फटका बसेल. त्यामुळे उगाच मराठी माणसाच्या शेपटावर पाय देऊ नका. मराठी माणूस शांत आहे तोवर ठीक आहे. एकदा जर सटकली तर 'हात' जबरदस्त भाजेल.

संजय निरुपम यापुढे असेच बरळत गेले आणि फेरीवाल्यांनी जर पुन्हा मराठी माणसावर हात टाकला तर तो हात कलम झाल्याशिवाय राहणार नाही. मराठी माणूस शांत व संयमी आहे. नामर्द नाही. त्याने ठरविले तर एका दिवसात मुंबई साफ होईल. ही बाब जितकी संजय निरुपमना कळायला हवी, तितकीच फेरीवाल्यांनासुद्धा समजायला हवी. आम्ही तुम्हाला आमच्या घरात जागा दिली आहे तिथे कायद्याने राहायचे. आमच्याच घरात दादागिरी सुरू केली तर खपवून घेतली जाणार नाही, हे फेरीवाल्यांनी कायम लक्षात ठेवले पाहिजे. आमच्या सुशांत माळवदेंवर हात टाकण्याची चूक केली आहे. पण ही शेवटची चूक असूदे. पुन्हा अशी चूक घडली तर माफी नाही. दुसरी चूक घडली तर भडका उडेल, एवढे निश्चित आहे. संजय निरुपम यांनी हात जोडून माफी मागायला हवी तरच वातावरण शांत होईल.

मनसेने अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात मोहीम उघडली त्यामुळे रेल्वे स्टेशनांच्या भोवतीचा परिसर मोकळा होऊ लागला आहे. मनसेचे मुंबईत २०१२ मध्ये २७ नगरसेवक निवडून आले होते. २०१२ पासून २०१७ पर्यंत या २७ नगरसेवकांच्या वॉर्डात फेरीवाले गुण्यागोविंदाने नांदत होते. मात्र पाच वर्षात २७ नगरसेवक ते एक नगरसेवक अशी घसरगुंडी झाल्यावर मनसेने काही बाबींवर पाणी सोडून अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात आंदोलन सुरू केले याचे स्वागत आहे. हल्ली महाराष्ट्रात अशी स्थिती आहे की, एखादं जरी चांगलं काम झालं तरी मराठी माणूस मागचा पुढचा विचार न करता खूश होतो. पण या मोहिमांचा शेवट योग्य झाला पाहिजे, नाहीतर ओल्याबरोबर उगाच सुकंही जळेल. संजय निरूपम यांनी फेरीवाल्यांना चिथावणी देऊन मराठी माणसाच्या अंगावर हात टाकला याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

फेरीवाल्यांना आमचा एक सल्ला आहे. त्यांनी संजय निरूपमच्या नादी लागू नये. संजय निरूपमच्या नादी लागले तर त्यांचा सत्यानाश होईल. तेव्हा संजय निरूपमना बाजूला सारून फेरीवाल्यांच्या नेत्यांनी राज ठाकरेंकडेच जावे आणि त्यांना विनंती करावी की, मुंबईत फेरीवाला झोन आखला जावा. यासाठी आम्हाला मदत करा. मुंबईत जसे परप्रांतीय फेरीवाले आहेत, तसे हजारो मराठी फेरीवालेसुद्धा आहेत. त्या सर्वांसाठी झोन आखून त्यांना त्या जागेत विक्रीची अधिकृत परवानगी दिली तरच त्यांचा प्रश्न सुटेल. पण फेरीवाला झोनबाबत कुणीही पुढाकार घेत नाही. त्यामुळे दर चार वर्षांनी हा प्रश्न उफाळून येतो. हा फेरीवाला झोन निर्माण होण्यासाठी राज ठाकरेंचा आक्रमकपणा उपयोगी ठरेल. त्यासाठी फेरीवाल्यांनी त्यांची मदत घेणे, हाच शहाणपणा ठरेल. परंतु फेरीवाल्यांनी हा मार्ग न स्वीकारता कायदा हातात घेण्याचा मूर्खपणा पुन्हा केला तर त्यांचा शेवट तेच ओढवून घेतील. राज ठाकरेंनी रुग्णालयात जाऊन माळवदेंची विचारपूस केली आणि काहीही प्रतिक्रिया न देता ते परतले. याचा सरळ अर्थ असा की, सोमवारपासून फेरीवाल्यांवर आभाळ कोसळणार आहे. तसे घडले तर फेरीवाल्यांना पोलीसही वाचवू शकणार नाहीत. संजय निरुपमच्या चिथावणीखोर भाषणावेळी पोलीस शांत बसले तसेच मनसेचे खळ्ळफट्याक सुरू होईल तेव्हाही पोलीस शांत बसतील.